महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
कस्तुरी बिल्डिंग, तळ मजला, जे.टाटा मार्ग,
पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२८८०१०६/०७ ईमेल आयडी - aotransfer२०२४@gmail.com

संदर्भ : दिव्यांग कल्याण विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२५/प्र.क्र.१०/E Office No.१३३९०२०/कार्यासन-३, दि.०९/१०/२०२५.

---

क्र.संलेको/२०२५/प्रशा-राप/ का-२/दिव्यांग प्रमाणपत्र/ ११३० दि. 13 NOV 2025

**विषय: महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी गट-ब (राजपत्रित) संवर्गातील दिव्यांग अधिकाऱ्यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र (UDID कार्ड) सादर करण्याबाबत.**

# -: परिपत्रक :-

संदर्भीय शासन निर्णयान्वये शासन सेवेत कार्यरत असलेले तसेच भरती, पदोन्नती किंवा इतर शासकीय लाभ दिव्यांग आरक्षणांतर्गत घेत असलेले सर्व दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांनी वैध Unique Disability ID (UDID) कार्ड प्राप्त करून त्याची प्रत सादर करणे बंधनकारक आहे.

त्यानुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सर्व दिव्यांग अधिकारी यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र / UDID ओळखपत्राची प्रत या परिपत्रकाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत संचालनालयास सादर करावी. तसेच आपल्या दिव्यांगत्व प्रमाणपत्र / UDID कार्ड बाबतची सविस्तर माहिती Google form : https://forms.gle/Q8h7hNp2pr3XDzyK6 वर भरणे आवश्यक आहे.

जे दिव्यांग अधिकारी दिव्यांगत्व प्रमाणपत्र /UDID ओळखपत्राची प्रत सादर करणार नाहीत किंवा चुकीचे/बनावट प्रमाणपत्र सादर केल्यास संबंधित अधिकारी यांच्या विरुद्ध दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ (कलम ९१) नुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

रश्मी नांदिवडेकर

(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, मुंबई.

प्रति,
सर्व संबंधित अधिकारी